ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# अवंतिकाबाई गोखले जीवन व कार्य

**देशमुख प्रतीक्षा ब्रम्हदेव**
संशोधक विद्यार्थी, विभाग– इतिहास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**गोषवारा**–महाराष्ट्रातील समाज सुधारणा चळवळ विसाव्या शतकात अवंतिकाबाई गोखले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अस्पृश्योद्धाराचे कार्य करुन अस्पृश्यांना योग्य वागणूक दिली स्त्री वर्गाच्या विकासासाठी महिला समाजाची स्थापना करून त्याद्वारे स्त्री शिक्षणाचे कार्य केले कार्पोरेशन मधील आपल्या कार्याद्वारे समाजाच्या दृष्टीने उपयुक्त असे अनेक कार्य अवंतिकाबाई गोखले यांनी केले की वर्ड्स–

1. अस्पृष्यता निवारण
2. चंपारण्यातील सुधारणा
3. स्त्री विषयक सुधारणा
4. हिंदी महिला समाजाची स्थापना

**प्रस्तावना** – 19 व्या शतकात स्त्रियांचे समाजातील स्थान अतिशय खालावलेले होते त्यांना कोणतेही अधिकार नव्हते स्त्रियांना अनेक बंधनात जीवन जगावे लागत असे यांना समाजात व कुटुंबात कोणतेही स्थान नव्हते एकोणिसाव्या शतकात ज्यावेळी भारतात सामाजिक सुधारणांना सुरुवात झाली त्यावेळी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यात आली सती प्रथा बालविवाह स्त्री शिक्षण या संदर्भात अनेक समाजसुधारकांनी सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला सुरुवातीला जरी श्री सुधारणांमध्ये पुरुश मंडळी अग्रस्थानी असली तरी नंतरच्या काळात अनेक स्त्रिया पुढे आल्या व त्यांनी स्वतःलाच स्वतःच्या समस्या सोडविण्याचा व स्त्रियांना संघटित करुन त्यांच्या अधिकारांची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला. सावित्रीबाई फुले तिच्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात पंडिता रमाबाई की ज्यांनी शारदा सदन या संघटनेद्वारे स्त्री उद्धाराचे कार्य केले लक्ष्मीबाई टिळक की ज्यांनी स्मृतिचित्रे या आत्मचरित्रात्मक लिखाणामुळे स्त्रीमुक्ती चळवळ व साहित्य क्षेत्रात प्रसिद्ध पावल्या काशीबाई कानिटकर डॉक्टर रखमाबाई राऊत डॉक्टर आनंदीबाई जोशी आनंदीबाई कर्वे पार्वतीबाई आठवले अशा अनेक स्त्री समाज सुधारक झाल्या की ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीतून सुधारणा चळवळीला मोलाचा हातभार लावला. ज्या काळात स्त्रियांवर अनेक बंधने लादून चूल व मूल हे स्त्रीचे कार्यक्षेत्र ठरविण्यात आले होते त्या काळात या स्त्रियांनी त्यांच्यावरील बंधने मोडून स्वतःचा उद्धार तर केलाच पण स्त्री वर्गाच्या प्रगतीसाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले अशा समाज सुधारक आन पैकी एक आणि यांच्या प्रभावाने महाराष्ट्रात मुंबई या ठिकाणी हिंद महिला समाजाची स्थापना करणाऱ्या अवंतिकाबाई गोखले या देखील एक स्त्री समाज सुधारक होऊन गेल्या ज्यांनी स्त्रियांना फक्त शिक्षित–अशिक्षित अस नाही तर सुशिक्षित करण्यासाठी आपले संपूर्ण आयुश्य पणाला लावले अशा या स्त्री सुधारक अवंतिकाबाई गोखले यांच्या कार्या या विशयाची माहिती प्रस्तुत शोधनिबंधात देण्यात आलेली आहे

**उद्दिष्टे**– 1. अवंतिकाबाई गोखले यांच्या अस्पृष्य उद्धाराच्या कार्याची माहिती मिळवणे 2. अवंतिकाबाई गोखले यांनी केलेल्या स्त्री विशयक सुधारणांची माहिती मिळवणे 3. हिंद महिला समाज या संघटनेतील शिक्षणाच्या कार्याची माहिती मिळवणे

**गृहितके**– 19 व्या शतकात स्त्री सुधारणा चळवळीत अनेक स्त्री यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अवंतिकाबाई गोखले यांनी अस्पृश्योद्धाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले हिंदी महिला समाजाच्या स्थापने द्वारे अवंतिकाबाई गोखले यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य केले

**व्याप्ती व मर्यादा**– स्त्री सुधारणा चळवळी मध्ये अनेक स्त्रियांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली असली तरी प्रस्तुत शोधनिबंधात अवंतिकाबाई गोखले यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे

**विषय ज्ञान**– 17 नोव्हेंबर 1882साली महाराष्ट्रातील इंदूर या ठिकाणी विष्णुपंत जोशी व सत्यभामाबाई या दापतत्यांच्या पोटी अवंतिका बाईचा जन्म झाला. अवंतिकाबाई हे त्यांचे तिसरे अपत्य पहिले दोन अपत्य गेल्यामुळे अवंतिकाबाई या अतिशय लाडाकोडात वाढलेल्या त्यांच्या शेजारीच राहणाऱ्या झाशीवाले बाई या नावाने परिचित असलेल्या बाईच्या पोटी त्यांना लहानपणी देण्यात येऊन कृष्णा हे त्यांचे नाव ठेवण्यात आले होते घरात त्यांना चिंगी या नावाने संबोधले जात असे ही मुलगी मोठेपणी चांगले नाव काढेल व कीर्ती मिळवेल असे भाकीत झाशी वाल्या बाईंनी करून ठेवले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह गोपाळराव गोखलेचे एकुलते एक पुत्र बबनराव गोखलेंशी करून देण्यात आला होता माहेरी अक्षर ओळख नसलेल्या अवंतिकाबाई यांनी सासरी शिक्षणाची संधी मिळाली गोपाळ गोखले व लक्ष्मीबाईंनी त्यांच्या शिक्षणात मोलाचे योगदान दिले बबनराव यांच्या इच्छेनुसार वयाच्या सतराव्या वर्षी नर्सिंगचे शिक्षण घेऊन मिडवायफरी झाल्या व या शिक्षणाच्या जोरावर भविष्यात त्यांनी समाजसेवेची अनेक कामे केली

1913 साली इचलकरंजीच्या राजे श्रीमंत घोरपडे यांच्या राणींना इंग्लंड ला पोहोचवण्याची जबाबदारी मिळाली त्यातून त्यांना इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली या प्रवासात अनेक गोष्टी त्यांना पाहिल्यावर शिकावयास मिळाल्या मग ते नेपोलियनचे थडगे असो की त्या ठिकाणच्या श्री संस्था नेपोलियन च्या थडगे पाहून त्यांना राष्ट्र

प्रतीचे प्रेमाची व राष्ट्रापती आपल्या असलेल्या कर्तव्याची जाणीव झाली व स्त्री संस्थांमुळे आपणही आपल्या देशात स्त्रियांना संघटित करून कार्यप्रवृत्त केले पाहिजे ही जाणीव त्यांच्यात निर्माण झाली व भारतात आल्यावर आपल्या या कार्याला लगेचच त्यांनी सुरुवात केली. सुरुवातीला गोपाळ कृष्ण देवधर की जे थोर भारत सेवक व पुण्याच्या प्रसिद्ध सेवासदन संस्थेचे शिल्पकार होते यांच्या मार्गदर्शनाखाली समाज सेवेला प्रारंभ केला सेवासदन मार्फत चालवण्यात येणाऱ्या शिक्षण प्रसार प्रचार प्रसाराच्या कार्यात त्या सहभागी झाल्या अवंतिकाबाई रोज दोन तास निरनिराळ्या वर्गांना शिकवीत असत त्याच बरोबर इंग्लंड मध्ये मॅचेस्टर बर्मिंघम या प्रसिद्ध औद्योगिक क्षेत्रात कामगार विभागात काम करणाऱ्या समाजसेविका चे कार्य त्यांनी पाहिले होते आणि तसेच कार्य आपण आपल्या देशातील कामगारांसाठी केले पाहिजे असे त्यांना वाटू लागले म्हणून त्यांनी लालबाग–परळ या कामगार वस्तीत दर आठवड्यात तीन तास जाऊ लागल्या तेथील कामगार स्त्रियांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे शिक्षणाची आवश्यकता त्यांना समजावून सांगणे आणि लहान मुलांची जोपासना कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखवणे अधिक कार्य त्या करू लागल्या भारतातील कामगार स्त्रिया कामावर जाताना आपल्या लहान मुलांना घरात कोंडून ठेवीत आणि त्यांची झोप मोडू नये म्हणून त्यांना यापुढे ती पद्धत किती चुकीची आहे याची जाणीव अवंतिका बाईंना होती इंग्लंडमध्ये त्यांनी पाहिले होते की गिरणीत कामगार स्त्रियांच्या लहान मुलांवर देखरेख करणारी शिशू संगोपन गृह असतात त्यावेळी भारतात असे एकही शिशू संगोपन गृह नव्हती अवंतिका बाईंनी गिरणी विभागात अनेकांच्या सहकार्याने शिशु संगोपन गृह स्थापन केले. अस्पृश्य वर्गाच्या प्रगतीसाठी आपण कार्य केले पाहिजे असे त्यांना वाटत होते त्यासाठी अस्पृश्य समाजात जाऊन त्यांच्यात मिसळून त्यांच्या त्यांच्या अडीअडचणी समजावून घेत असे त्यांच्या सुख–दुःखात सहभागी होत असत अस्पृश्य समाजाच्या सहवासात आल्यानंतर संक्रांतीचा सण त्यांनी कधीही घरी साजरा केला नाही प्रत्येक संक्रांतीच्या दिवशी एक डबाभर तिळाचे लाडू घेऊन त्या अस्पृश्य वस्तीत जात असत आणि तिथे हळदी कुंकाचे समारंभ करून त्या सर्व अस्पृश्य महिलांकडून तिळगुळ घेत व तसेच या कामात काकासाहेब खाडिलकर यांच्या पत्नी सौ गौरीताई खडीलकर यांचे त्यांना सर्वात अधिक सहकार्य मिळाले.

1916 चे लखनऊ अधिवेशनात त्या सहभागी झाल्या होत्या या अधिवेशनात गांधीजींबरोबर त्यांचा परिचय झाला व यानंतर गांधीजींच्या प्रत्येक कार या कार्यात त्या सहभागी झाल्या गांधीजींच्या चंपारण याच्या सत्याग्रहात त्या सहभागी झाल्या व बॅड ठरवा या गावात सहा महिने वास्तव्य करुन श्री शिक्षणाचे व समाज जागृतीचे कार्य त्यांनी केले. बरहरवा या ठिकाणी स्त्रियांसाठी व मुलींसाठी त्यांनी जे कार्य केले त्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला होता आपण स्त्रियांना संघटित करून त्यांच्या उद्धारासाठी कार्य केले पाहिजे हा विचार त्यांच्या मनात निर्माण झाला व त्यातूनच 27 नोव्हेंबर 1918 सालि हिंद महिला समाज या संघटनेची स्थापना करुन श्री उद्धाराच्या कार्याला त्यांनी सुरुवात केली हिंदी महिला समाजात द्वारे स्त्रियांसाठी वाचनालय सुरु करण्यात आली त्याचप्रमाणे स्त्रिया इंग्रजी व हिंदी भाशेचे ज्ञान देण्यासाठी ही वर्ग सुरू करण्यात आले श्री यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी विविध कला कौशल्याचा शिक्षणाचा प्रसारही स्वर्गात करण्यात आला एवढेच नव्हे तर स्त्रियांमध्ये राष्ट्राभिमान जागष्त करण्याच्या दृष्टीने 1920 सालापासून अवंतिका बाईंनी समाजात खादीचा प्रचार सुरू करून सूत कातण्याची वर्गही सुरू केले त्याचबरोबर महात्मा गांधी लोकमान्य टिळक व श्री गुरव गोपाळ कृश्ण देवधर यासारख्या प्रसिद्ध पुढाऱ्यांची भाषणे होत हाऊसफुल अधिवेशनातही अवंतिकाबाई यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांचे पथक त्या ठिकाणी कार्यरत होते अवंतिका बाईंना मूलबाळ नव्हते हिंद महिला समाज ही संस्था त्यांची मानसकन्या होती सतत 31 वर्ष या संस्थेचे पालनपोषण त्यांनी केले

1923 साली अवंतिका बाईंचा मुंबईच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशन मध्ये प्रवेश झाला कॉर्पोरेषन मध्ये सभासद म्हणून गेलेल्या पहिल्या स्त्री सभासदांपैकी त्या एक होते त्या ठिकाणीही त्यांनी भरीव अशी कामगिरी केली शाळेत जाणारी मुले दुपारच्या वेळी फेरीवाल्याकडुन जो जिन्नस घेऊन खातात ते अस्वच्छ व अनारोग्यकारक आहे म्हणून त्यांनी ते खाद्यपदार्थ विकण्यावर बंदी घातली त्याचप्रमाणे चौपाटीवर होणारे घाण अधिक कार्यक्षमतेने साफ करून घ्यावी असाही एक ठराव त्यांनी पास करून घेतला. भारतीय स्वातंर्त्य चळवळीतही त्या सहभागी झाल्या व त्यासाठी त्यांना तुरुंगवास भोगावा लागला हिंद महिला समाज असो कॉर्पोरेशनची बैठक असो कॉंग्रेसची सभा असो वा घरातील वागणूक असो प्रत्येक बाबतीत शिस्त हा त्यांचा आधी दंडक होता

**सारांश**– अषाप्रकारे महाराश्ट्रातील समाज सुधारणा चळवळ विसाव्या शतकात अवंतिकाबाई गोखले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अस्पृष्योद्धाराचे कार्य करून अस्पृष्यांना योग्य वागणूक दिली स्त्री वर्गाच्या विकासासाठी महिला समाजाची स्थापना करून त्याद्वारे स्त्री षिक्षणाचे कार्य केले कार्पोरेषन मधील आपल्या कार्याद्वारे समाजाच्या दृश्टीने उपयुक्त असे अनेक कार्य अवंतिकाबाई गोखले यांनी केले

*संदर्भसूची–*

1. *तिवारी विनायकय आदर्श हिंदू महिला, व्हीनस प्रकाशन, मुंबई 1950*
2. *गाठाळ एस एसय भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन ,औरंगाबाद, जुलै 2013*
3. *हिंद महिला समाज अहवाल, सुवर्ण महोत्सव,1968*
4. *हिंद महिला समाज अहवाल ,अमृत महोत्सव 1968 ते 1993*
5. *प्रसाद राजेंद्रय चंपारण्य मे महात्मा गांधी, आत्माराम अँड सन्स, दिल्ली,1955*
6. *ढेरे अरुणाय विस्मृती चित्रे,श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 25 नोव्हेंबर 1998*